**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शिवानंद नारायण कट्टीमणी<br>११, जांबवीर हौ. सोसायटी,<br>मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | क्रीडाधिकारी तथा कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी,<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |

सोलापूरातील दोन जलतरण तलाव सौ. शांताबाई शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेस केव्हापासून कोणत्या शर्ती व अटीस अधीन राहून व कोणत्या सभेच्या ठरावाने चालविण्यास दिले, त्या ताब्यात दिलेली तारीख, शर्ती व अटी बाबत झालेल्या कराराच्या नकलेच्या झेरॉक्स प्रती, खाजगीकरण का व केव्हा रद्द केले, कोणत्या सभेच्या मान्यतेने केले, त्या सभेच्या ठरावाची प्रत व रद्द केलेल्या अधिकाराची जी.आर.ची झेरॉक्स प्रत व इतर मुद्द्यांबाबतची माहिती अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा क्रीडाधिकारी, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. त्यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने श्री. शिवानंद नारायण कट्टीमणी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स) सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे अपील केले. मात्र काही माहिती दिलेली नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स) सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी मान्य केले व आठ दिवसांत जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी, असे आदेश दि. २६.४.२००७ रोजी दिले, असे कागदपत्रांवरून दिसते. परंतु आपण पूर्ण माहिती विविध विभागांकडून संकलीत करून विहित मुदतीत दिली असल्याचे व प्रथम अपिलाचा निर्णय आपली बाजू ऐकून न घेता दिला असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी

म्हटले आहे. माहिती पूर्ण दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विशेष अपील निर्गत कार्यक्रमामधील निवेदनात लेखी नमूद केले. मात्र अद्याप परिपूर्ण माहिती मिळाली नसल्याचे प्रतिपादन अपीलकर्त्याने केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मूळ अर्जानुसार कोणती माहिती द्यावयाची राहिली, याचा तपशील आठ दिवसांत अपीलकर्त्याने जन माहिती अधिकाऱ्यांना द्यावा, आयोगाला त्याची प्रत पाठवावी. मूळ अर्जात मागितलेल्या माहितीतील माहिती द्यावयाची राहिली असल्यास तपासून त्याची पूर्तता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यांचे निवेदन प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत करावी. त्याबाबतचा अहवाल आयोगाला त्यानंतर त्वरित सादर करावा.

पुणे
दि. 30 .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.संजय साहेबराव बाबर
मातोश्री निवास, सातारा — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक सहकारी संस्था,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सरव्यवस्थापक,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, सातारा

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ४८ / सातारा / २००७ |
| २.सुनावणीची तारीख | २१.१.२००८ |

**३.उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय साहेबराव बाबर
मातोश्री निवास, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक सहकारी संस्था,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.के.पी.जेबले

**जन माहिती अधिकारी** तथा सरव्यवस्थापक,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, सातारा श्री.ए.एस.नलावडे

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | १०.८.२००६ |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | -- |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | २२.११.२००६ |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | १५.१२.२००६ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि.२९.४.२००६ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीतील बँक सेवकांना बडतर्फ करण्याच्या झालेल्या ठरावाची नक्कल. दि.१.४.२००२ ते ३१.३.२००३ या वर्षासाठी हायटेक विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे कामकाज वाटपाची खरी नक्कल. माहे जानेवारी २००२चे मूळ पगारपत्राची नक्कल. उपव्यवस्थापक, हायटेक विभाग यांनी प्रशासनास जानेवारी २००३ अखेर पाठविलेल्या गुप्त अहवालाची नक्कल.

## विवेचन

सातारा जिल्हा मध्यवती सहकारी बँकेत दि.२९.४.२००६ रोजी संचालक मंडळाच्या बैठकीत सेवकांना बडतर्फ करण्यासंबंधी झालेल्या ठरावाची नक्कल, कर्मचाऱ्यांच्या कामकाज वाटपाची नक्कल इ. माहिती अपीलकर्ता श्री.संजय साहेबराव बाबर यांनी जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, सातारा यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तराविरुध्द श्री.बाबर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली असली तरी कागदपत्रांच्या सत्यप्रती करुन देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी सत्यप्रती दिल्या. परंतु खोटी कागदपत्रे तयार करुन दिली असल्याचा आरोप करुन श्री.बाबर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.बाबर हे बँकेचे कर्मचारी होते व त्यांची बदली बँकेच्या नेले, ता.सातारा या शाखेत करण्यात आली होती. परंतु ते हजर न होता दिर्घकाळ विनापरवानगी गैरहजर राहिल्यामुळे बँकेने त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई केली होती, असे बँकेच्या वतीने आयोगाला सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे. त्यांना दिलेली माहिती योग्य व सत्यप्रतीत असून खोटी कागदपत्रे बनविल्याचा त्यांचा आरोप निखालस खोटा आहे. संबंधित कागदपत्रे त्यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती, असे नमूद करुन जन माहिती अधिकारी श्री.ए.एस.नलावडे यांनी आयोगापुढे ही कागदपत्रे सादर केली. कामकाज वाटपाच्या माहितीबाबत श्री.बी.जे.जाधव यांच्या 'कृषी अधिकारी' या पदाऐवजी 'अधीक्षक ' असे चुकून टायपिंग झाले आहे. ही तांत्रिक चूक असून दुरुस्त करुन देण्यात अडचण नाही, असे पूर्वीही स्पष्ट केलेले आहे, असेही श्री.नलावडे यांनी सांगितले. खातेनिहाय चौकशीमध्येही श्री.बाबर यांना हवी असलेली सर्व कागदपत्रे देण्यात आली असून औद्योगिक न्यायालय, सातारा येथे बँकेविरुध्द त्यांनी केलेल्या दाव्यात सर्व कागदपत्रे सादर केलेली आहेत. हा दावा प्रलंबित आहे, असेही त्यांच्या निवेदनात म्हटले

आहे. मूळ खरी कागदपत्रे नष्ट करुन खोटी कागदपत्रे तयार करुन ती सादर केली जात आहेत. आपल्या कामाबाबत उपव्यवस्थापक, हायटेक विभाग यांनी प्रशासनाला पाठविलेल्या गुप्त अहवालाची मूळ प्रत जाणीवपूर्वक नाकारण्यात आलेली आहे व न्यायालयातही दिलेली नाही, असे प्रतिपादन श्री.बाबर यांनी विस्ताराने लेखी व तोंडी केले. 'वकील, न्यायाधीश यांना हाताशी धरुन / मॅनेज करुन / दबावाने' अशा स्वरुपाची भाषा श्री.बाबर यांनी लेखी व तोंडी वापरली आहे. ती आक्षेपार्ह आहे. कागदपत्रे खोटी असल्याचे व बनावट केल्याचे विधान करण्यापलीकडे कोणताही पुरावा ते देऊ शकलेले नाहीत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता श्री.बाबर यांना फक्त गोपनीय अहवालाची प्रत दिलेली दिसत नाही. ती आठ दिवसात द्यावी, तसेच कामकाज वाटपाची कागदपत्रे मूळ प्रतीनुसार दिल्याची तपासणी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था श्री.ए.पी.जेबले यांनी करावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते. संबंधित प्रतींची आपण शहानिशा केली असल्याचे श्री.जेबले यांनी स्पष्ट केले. श्री.बाबर यांच्या संबंधातील 'गुप्त अहवालाची प्रत' दि.२२.१.२००८ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.बाबर यांना पाठवून आयोगाला संबंधित प्रतीसह अवगत केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

पुणे

दि.७.७ .२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१९.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | ५ / सोलापूर | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | श्री. हुकुमचंद हरिलाल भलाणी<br>मु.पो.कुर्डूवाडी, श्रीदत्त रोड, ता. माढा,<br>जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय,<br>मुंबई-३२ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय,<br>मुंबई-३२ | हजर |

अपीलकर्ता श्री. हुकुमचंद हरिलाल भलाणी यांनी लायसन्स क्र. सीएल-३ संबंधी राज्य शासनाने काढलेल्या शासन निर्णयांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय यांच्याकडे मागितल्या होत्या.

आवश्यक कागदपत्रांसाठी विहित शुल्क रू.६४/- भरण्याबाबत अपीलकर्त्याला कळविण्यात आले. परंतु अपीलकर्त्याने शुल्क भरले नाही व माहिती घेण्यासाठी संपर्क साधला नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी नमूद केले. तसेच प्रथम अपील केले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले. आवश्यक असल्यास अपीलकर्त्याने शुल्क भरून माहिती प्राप्त करून घ्यावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१.७.२००८**

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०२ + ५०३ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजाराम दामू काळेबाग<br>मु.पो.अचकदाणी, ता. सांगोला, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, सांगोला<br>जि. सोलापूर | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, सांगोला, जि. सोलापूर | हजर |

राष्ट्रीय कुटुंब सहाय्य योजनेमध्ये सौ. शोभा श्रीरंग बाबर यांना दोनदा लाभ दिला असून अनुदान वहीची छायांकित प्रत अपीलकर्ता श्री. राजाराम दामू काळेबाग यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला यांच्याकडे मागितली होती. संबंधित लाभार्थीकडून दि. १.६.२००७ रोजी रू.१०,०००/- वसुल केली आहे. अनुदान वाटपात पुन्हा चूक होऊ नये, याची समज जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला यांना देऊन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, सांगोला यांनी प्रथम अपील निकाली काढले. माहिती मिळाली असून संबंधितांकडून वसुलीही झाली असल्याने आपले समाधान झाले आहे व तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्त्याने नमुद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २९ .७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१४ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. अर्जून सिद्राम सलगर<br>मारूती टेळे संकुल, ७८६, दक्षिण कसबा,<br>शिंदे चौक, सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रमुख लिपिक, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, ११ नवी पेठ, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर | हजर |

वर्षनिहाय तेलगु भाषिक शिक्षकांची माहिती तक्ता 'अ' प्रमाणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची माहिती तक्ता 'ब' प्रमाणे, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ कार्यालय लिपिक पदाची माहिती तक्ता 'क' प्रमाणे व चित्रकला शिक्षकांची माहिती तक्ता 'ड' प्रमाणे जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर, यांच्याकडे मागितली होती. माहितीसाठी शुल्क भरण्यास कळवूनही ते भरले नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे. अपीलकर्त्याने शुल्क भरून न घेता प्रथम व द्वितीय अपील केले आहे. अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. रू. ३६०/- शुल्क भरून अपीलकर्त्याने माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून घ्यावी.

पुणे
दि. ८ .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१५ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. आनंद सायबू क्षीरसागर<br>भारती विद्यापीठजवळ, सुशीलनगर,<br>घर नं.६७, विजापूर रोड, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

शहर उत्तर सोलापूर व शहर सोलापुरातील फक्त ८ वी ते १० वी पर्यंतच्या ज्या शाळांना फेब्रुवारी २००१ साली ६० टक्के अनुदान शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून दिले त्या प्रत्येक शाळेत एकूण किती पदे मंजूर आहेत, मान्यतेच्या प्रती, वार्षिक तपासणी अहवाल, शाळेला अनुदान मिळविण्यासाठी मुख्याध्यापकांनी पाठविलेली कर्मचाऱ्यांची यादी, मूल्यांकन फाईल, जून १९९८ ते जानेवारी २००३ वरील नमूद केलेले कागदपत्र निरीक्षणासाठी मिळावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री. आनंद सायबू क्षीरसागर यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी काहीही उत्तर दिले नाही. वरील माहिती निरीक्षणासाठी एक महिन्यात दाखविण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १८.६.२००८ रोजी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मधील निवेदनात लेखी नमूद केले. मूळ अर्ज दि.२२.५.२००७ चा असून एक वर्षाहून अधिक काळ उलटल्यानंतरही कागदपत्रे निरीक्षण करू देण्यास जन माहिती अधिकारी मुदत मागत आहेत, ही गंभीर बाब आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. विद्याधर जगताप व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एस. के. सगरे त्याबद्दल शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास माहिती निरीक्षणासाठी न दिल्याबद्दल, म्हणजेच माहिती नाकारल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. विद्याधर जगताप व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, श्री. एस. के. सगरे यांना प्रत्येकी रू. १२,५००/- शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्ती त्यांच्याकडून ऑगस्ट २००८ च्या सप्टेंबर २००८ मध्ये मिळणाऱ्या वेतनातून तीन महिन्यांत वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, १८ माहितीचा अधिकार ००७००१६१' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी करावी. तसेच त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तक व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

३. प्रथम अपिलाची दखल विहित मुदतीत घेतली पाहिजे. याची जाणीव, व ती न घेतल्याबद्दल तत्कालीन अपिलीय प्राधिकारी त[illegible] शिक्ष[illegible]ाधिकारी (माध्यमिक), जिल्हा प[illegible]षद, सोलापूर श्री. व्ही. जे. हाके यांना क[illegible]क समज देण्यात [illegible] आहे

पुणे
दि. ३१ .७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१७ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शिवाजी हणमंत सुगरे<br>सलगरवस्ती, डोणगांव रोड, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | बँक व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जि.सोलापूर | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. शिवाजी हणमंत सुगरे यांनी बालविकास मंदिर, सलगरवाडी या शाळेच्या वेतनेतर खात्यावरील सन २००० ते मार्च २००७ अखेर सालवार रक्कम कोणाकडून प्राप्त झाली, रक्कम किती, धनादेश क्र. व रक्कम कोणी काढली इ. बाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा बँक व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., नेहरूनगर, सोलापूर यांच्याकडून मागितली होती. मूळ अर्ज संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडे वर्ग न करता माहिती घेण्याबाबत कळविले. तसेच नियमबाह्यपणे शुल्क आकारणे, मानसिक, शारीरिक व आर्थिक हानी झाल्याबद्दल नुकसान भरपाई म्हणून रू.५०००/- मिळावी, अशी श्री. सुगरे यांची मागणी होती. ती अमान्य करण्यात येत आहे. बँकेची शाखा हे वेगळे प्राधिकरण नसल्यामुळे अर्ज वर्ग करण्याची गरज नाही, हे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे योग्य आहे. अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .७.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. मुस्ताक हुसेनसाब लालकोट<br>श्री. साथी बशीर अहमद बाशामियाँ शेख<br>जिल्हा परिषद, स्टेट बँकेसमोर, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तहसीलदार, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर<br>श्री. बाबासाहेब वाघमोडे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. सिध्दाराम सालीमठ | हजर |

अपीलकर्ता श्री. मुस्ताक हुसेनसाब लालकोट व श्री. साथी बशीर अहमद बाशामियाँ शेख यांनी दि. १६.६.२००७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे दिलेल्या पत्रावर (नो.क्र.७२/०३) कोणती कार्यवाही करण्यात आली, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५, नियम ४.ब प्रमाणे तयार केलेल्या कागदपत्रांचे निरीक्षण करण्याची परवानगी मिळण्याबाबत मागणी केली होती. कार्यवाहीबाबत पूर्वी कळविण्यात आले होते व ऊर्वरित माहिती अपीलकर्त्यास दि. १७.६.२००८ रोजी उपलब्ध करून दिल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. विहित मुदतीत माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 .७.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२७ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विश्वास जनार्धन जाधव<br>८३७१/८२, रेल्वे लाईन, फॉरेस्ट, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

मार्च १९९७ ते जून २००४ पर्यंत किती प्रशालांची मान्यता शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून काढून घेण्यात आली, कोणत्या कारणांमुळे मान्यता काढून घेण्यात आली, प्रशालेची मान्यता काढून घेण्यासाठी कोणते निकष लावले जातात, प्रशालेतील कर्मचाऱ्यांना मान्यता देताना कोणकोणत्या कागदपत्रांची तपासणी केली जाते, संस्था मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची मान्यता काढण्यासाठी कोणते निकष लावले जातात, याची माहिती अपीलकर्ता श्री. विश्वास जनार्धन जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी काही माहिती दिली, परंतु ६२ दिवस विलंबाने दिली. मान्यता काढून घेण्याच्या संदर्भातील काही नियमांच्या प्रती दिल्या नाहीत, असे अपीलकर्त्याने नमूद केले. उर्वरित माहिती पंधरा दिवसांत अपीलकर्त्यास देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले.

माहिती ६२ दिवस विलंबाने दिल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे असले तरी मूळ अर्ज दि. १६.५.२००७ चा असून जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. २१.५.२००७ रोजी माहिती पाठविल्याचे कागदपत्रांवरून दिसते. मात्र पूर्ण माहिती दि. २०.७.२००७ रोजी दिल्याचे दिसते. माहितीचे प्रमाण

लक्षात घेता विलंब लागल्याचे जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांचे म्हणणे मान्य करण्यात येत आहे. मात्र माहिती विहित मुदतीत देण्याबाबत अधिक तत्पर राहण्याची गरज असल्याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. विद्याधर जगताप यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांस माहिती पंधरा दिवसांत उपलब्ध करून देण्याबाबत मान्य केल्याप्रमाणे कार्यवाहीचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.८.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 39 .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२९ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. महेश वसंत बेंडे<br>१६, शैलनील हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी,<br>पौड रोड, कोथरूड, पुणे-३८ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,<br>पिंपरी, पुणे-१८ | हजर |
| ४ | अपिलीय अधिकारी | अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,<br>पिंपरी, पुणे-१८ | हजर |

अपीलकर्ता श्री. महेश वसंत बेंडे यांनी महानगरपालिकेची प्रारूप नियमावलीबाबत माहिती मागितली होती.

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. अपीलकर्त्याने आपल्या सर्व शंकांचे निराकरण व मागणी केलेली सर्व माहिती प्राप्त झाल्याचे समक्ष लेखी व तोंडी प्रतिपादन केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 23.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३२ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे<br>२९, सिध्देश्वर नगर, विजापूर रोड,<br>भारती विद्यापीठजवळ, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्रीमती एस.व्ही. गायकवाड | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर<br>श्री. सिध्दराम सालीमठ | हजर |

अपीलकर्ता श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांची माहे जानेवारी २००६ ते एप्रिल २००७ अखेरची दैनंदिनीची प्रत, दैनंदिनी संबंधित पत्रव्यवहार व जोडपत्रे, जिल्हाधिकारी यांच्या माहे मार्च २००६ व मार्च २००७ चे नियोजित फिरती कार्यक्रमाची प्रत, तसेच त्यांच्या वाहनाची मार्च २००६ व मार्च २००७ च्या लॉगबुकची प्रत मागितली होती.

अपीलकर्ता श्री. अक्कलकोटे यांना माहिती सात दिवसांत देण्याचे वरील तीनही घटकांमधील चर्चेत जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी मान्य केले. 'नियोजित फिरती कार्यक्रम' निश्चित असेल तवढीच प्रत द्यावी. उपरोक्त दैनंदिनी व त्यासंबंधीचा पत्रव्यवहार, जोडपत्रे या माहितीतून कोणते सार्वजनिक हित साधले जाणार आहे, हे अपीलकर्ता स्पष्ट करू शकलेला नाही. केवळ माहितीसाठी माहिती मागणे हा माहितीच्या अधिकाराचा योग्य वापर नाही, याची जाणीव अपीलकर्त्यास 'देण्यात' येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

१. अपोल निकाली काढण्यात येत आहे.

२ अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांनी अपीलकर्त्यास सात दिवसांत माहिती देऊन पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. ३१.७.२००८**

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३५ /पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री.विजय नामदेव सोनवणे<br>पंचशीलानगर, कसबा-बारामती, ता.बारामती, जि.पुणे |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद,<br>बारामती, जि.पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त, नगरपालिका प्रशासन,<br>आयुक्त कार्यालय, पुणे |

अपीलकर्ता श्री. विजय नामदेव सोनवणे यांनी श्री. सुधीर ना. पाखरे व श्री. बाळाराम भोंडे या बारामती नगरपरिषद, बारामती येथील कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींची माहिती मागितली आहे.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने यापूर्वी आयोगाने अपील क्र.७५/पुणे मध्ये निर्णय दिलेला आहे. सदर निर्णय या अपिलात ही कायम ठेवण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ०८.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२७.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. झुंजार बाबुराव सावंत<br>अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड साहित्य संस्कृति मंडळ,<br>पेठ क्र.२७, भूखंड-२२३, पात्र्चजन्य प्राधिकरण,<br>पुणे-४४ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड<br>महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८. | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अतिरिक्त आयुक्त,<br>पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ | हजर |

अपीलकर्ता श्री. झुंजार बाबुराव सावंत यांनी पर्यावरण कार्याच्या माहितीच्या अनुषंगाने एकूण ४६ मुद्दयांची माहिती मागितली होती.

मागितलेली माहिती प्रश्न/उत्तरे स्वरूपात असून ज्या कागदपत्रांमधील माहिती अपेक्षित आहे, त्या कागदपत्रांचा आवश्यक तो संदर्भ दिल्यास त्या आधारे माहिती देता येईल, असे जन माहिती अधिकारी तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी कळविले. या निर्णयाविरुध्द श्री. सावंत यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले. अपीलकर्त्याने माहितीचा तपशील सुस्पष्ट दिल्यास अभिलेखात असणारी देय माहिती विहित मुदतीत देण्यात येईल, असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानुसार श्री. सावंत यांनी अद्याप तपशील दिला नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. श्री. सावंत यांनी अनेक मुद्दयांमध्ये माहितीची मागणी मोघम स्वरूपात व सरसकट अशी केली आहे. ते लक्षात घेता जन माहिती

अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. मात्र या मुद्दयांमधील नेमकेपणाने मागितलेली माहिती (उदा. मुद्दा क्र.२,५,६, १३ इ.) दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याच्या मूळ अर्जानुसार देय अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांत निःशुल्क देऊन आयोगास पूर्तता अहवाल सादर करावा.

**पुणे**
**दि. ३०.७.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५१ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. बाळकृष्ण गजानन जोशी, अल्प उत्पन्न गट इमारत क्र. ३, गाळा क्र. ४५, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, कोनार्क सोसायटी, लक्ष्मीनगर, पुणे-९ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | दुय्यम निबंधक, जुन्नर, तहसील कार्यालय आवार, जुन्नर, दादोजी कोंडदेव वाडा, ता. जुन्नर, जि. पुणे - ४१० ५०२ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (निम्नस्तर) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे ग्रामीण, पुणे पुष्पमंगल इमारत, दुसरा मजला, बिबवेवाडी कॉर्नर, पुणे-सातारा रोड, पुणे-३७ | हजर |

अपीलकर्त्यानें १९५० ते २००६ या कालावधीतील दुय्यम निबंधक, जुन्नर कार्यालयात नोंद असलेल्या व जुन्नर नगरपालिकेकडून आलेल्या कागदपत्रांची माहिती (सि.स.नं.६०१ व ५९६ ते ६०० ), तसेच दस्त क्र. ६३२/०५ प्रमाणित नक्कल व नोंदणी झालेल्या दस्तऐवजांचा तपशील अशी माहिती मागितली होती.

माहिती नोंदणीकृत टपालाने पाठविली आहे व ती अपीलकर्त्यास दि. ९.११.२००६ रोजी प्राप्त झाल्याची पोहोच आहे.

ऊर्वरित माहितीसंबंधी शुल्क भरण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. परंतु त्यांनी शुल्क भरले नाही, तसेच कोणत्याही प्रकारे कार्यालयाशी संपर्क साधला नाही वा निवेदन दिलेले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, जुन्नर यांनी लेखी नमूद केले आहे.

११.६.०८

उपलब्ध कागदपत्र, निवेदने इ. चे निरीक्षण केले असता जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येते. मात्र शुल्क आकारताना २०/- रू. प्रती पान या दराबाबत स्पष्ट खुलासा करणे आवश्यक होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी शुल्क कळविताना त्याचा संपूर्ण तपशील देण्याची दक्षता घ्यावी.

**पुणे**
**दि. ७ .७.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**